# तेव्हाच अनिल देशमुखांना अटक होईल : किरीट सोमय्या

## सर्वोच्च न्यायालयाचा देशमुखांना दिलासा नाहीच

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी) :** १०० कोटींच्या वसुलीप्रकरणात राजीनामा द्यावे लागलेले राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता पुन्हा एकदा निर्माण झाली आहे. 'ईडी'पासून होणाऱ्या संभाव्य अटकेपासून आपला बचाव करण्यासाठी अनिल देशमुख यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, शुक्रवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने देशमुख यांना कोणताही दिलासा दिलेला नाही. या पार्श्वभूमीवर भाजपनेते किरीट सोमय्या यांनी देशमुख यांच्यावर टीका केली आहे.

देशमुखांवर टीका करताना किरीट सोमय्या म्हणाले की, ''अनिल देशमुख यांना अटकेपासून संरक्षण देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. जेव्हा अनिल देशमुख हे सार्वजनिकरीत्या बाहेर येतील, तेव्हा लगेच 'सीबीआय' आणि 'ईडी' त्यांना अटक करतील,'' अशी शक्यता किरीट सोमय्या यांनी व्यक्त केली आहे.



**देशमुखांच्या पुत्राला 'ईडी'चे समन्स**

अंमलबजावणी संचालनालयाने यापूर्वी दोन वेळा अनिल देशमुख यांना समन्स बजावलेले आहे. आता मात्र शुक्रवारी अनिल देशमुख यांचे पुत्र हृषीकेश देशमुख यांनादेखील कथित आर्थिक घोटाळ्याच्या प्रकरणात नवीन समन्स बजावण्यात आले आहे. त्यानुसार हृषीकेश देशमुख यांना सोमवारी 'ईडी'ने चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे.

**देशमुखांना दिलासा नाहीच**

भ्रष्टाचार आणि खंडणीवसुलीच्या आरोपांवरून देशमुख यांच्याविरोधात 'सीबीआय'ने दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. ''सध्या अनिल देशमुख यांच्यावरील आरोपांची 'सीबीआय' चौकशी सुरू आहे, अशा वेळी न्यायालयाचा हस्तक्षेप हा सत्य उघड करण्यातील अडथळा ठरू शकतो. त्यामुळे 'सीबीआय'ला सत्य शोधण्यापासून रोखले जाऊ शकत नाही,'' असे न्यायालयाने देशमुख यांची याचिका फेटाळताना स्पष्ट केले आहे.

**कारवाईचा फास आवळताच**

सरकारी तपास यंत्रणा आता आपला दिवसेंदिवस फास अधिकच घट्ट करत आहेत. १०० कोटी रुपयांच्या वसुलीप्रकरणी 'सीबीआय'कडून अनिल देशमुख यांच्याशी संबंधित असलेल्या १२ ठिकाणांवर नुकतीच छापेमारी केली गेली आहे. यामध्ये मुंबई, पुणे, नाशिक, सांगली व अहमदनगर येथील ठिकाणांचा समावेश आहे. तर अहमदनगर आणि मुंबईमध्ये 'डीसीपी' राजू भुजबळ यांच्या घरी आणि पुणे, मुंबईत 'एसीपी' संजय पाटील यांच्या निवासस्थानी छापेमारी करण्यात आली होती.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी दानशूरांनी पुढे यावे

## रा. स्व. संघाच्या जनकल्याण समितीचे आवाहन

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी):** मुंबई व कोकणात अतिपर्जन्यवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाल्याने शेकडो कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. आधीच कोरोनाचा प्रादुर्भाव आणि त्यात पुराचे सावट यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या कोकणवासीयांना सध्या खऱ्या आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. या मदतकार्यात अधिकाधिक दानशूरांनी आर्थिक साहाय्य करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे पूरग्रस्त कोकणवासीय आणि नुकसानग्रस्त मुंबईकरांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीच्या वतीने मोठ्या प्रमाणावर सेवाकार्य सुरू करण्यात आले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केलेला आवाहनानुसार, सामाजिक बांधिलकीच्या नात्याने



केलेली एक छोटीशीही मदतही या संकटग्रस्त बांधवांमध्ये जगण्याची उमेद निर्माण करू शकते. त्यामुळे समाजातील इच्छुक आणि दानशूर व्यक्तींनी http://www.rssjankalyan.org/seva-nidhi/ या वेबसाईटच्या साहाय्याने किंवा Account- RSS JANAKALYAN SAMITI, Bank of Maharashtra, Acct No. 20057103852, IFSC. MAHB0000041 या बँक खात्यावर शक्य तेवढी आर्थिक मदत पाठवून पूरग्रस्त्यांच्या मदतकार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीच्या वतीने करण्यात आले आहे.


**जाहीर नोटीस**

यादवारे जाहिर नोटीस देण्यात येते की, माझे क्लाइंट **श्रीमती प्रज्ञा प्रविण डिकवलकर आणि श्री. प्रवीण रामचंद्र डिकवलकर** राहणार ए/००३, मोरेश्वर श्री अष्टविनायक को.ऑप.हौ.सो.लि.,फूलपाडा रोड, राजस बंगल्याच्या जवळ, आर. जे. नगर, विरार (पू), तालुका - वसई, जिल्हा- पालघर- ४०१३०५. त्यांनी रुम विकत घ्यायचे ठरवले आहे. विकत घ्यायच्या मालमत्तेचा तपशील- अवंतिका कॉम्प्लेक्स को.ऑप. हौ.सो.लि., रुम नं.२०६,बी-विंग, दूसरा मजला, गाव कोपरी-चंदनसार, विरार (पू), तालुका - वसई, जिल्हा - पालघर- ४०१३०५. महाराष्ट्र. रुमचा क्षेत्रफळ ५००स्वे.फिट ४६.४६ स्केअर मीटर बिल्टअप असा आहे. सर्वे नं.११५ (जुना सर्वे नं.४), हिस्सा नं. ३५/४४-ए असा असुन, सोसायटी नोंदणी क्र.पीएलआर /व्हीएसआय/एचएसजी/(टीसी)/३४३/सन २०१८, दिनांक २८/०२/२०१८ असा आहे. सदर रुम श्रीमती. सायली सुरेश लाड व कै. सुरेश लक्ष्मण लाड यांच्या नावावर आहे. कै. सुरेश लक्ष्मण लाड हे ०३-११-२०२० रोजी मयत झाले आहेत.

तरी सदर वरील मालमत्तेबद्दल कोणालाही काही आक्षेप असेल किंवा हक्क वरील सांगितलेल्या मालमत्तेवर आणी त्या मालमत्तेच्या वरील समाजातील वाटा, वारसा, विक्री, भेट, तारण, शुल्क, भाडेपट्टा,परवाना, विनिमय ताब्यात अडचण किंवा इतर कोणताही अधिकार असेल, तर जाहिर नोटीसच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत सी-१०३, साई सिदधी अपार्टमेंट, पंडित वाडी, पोलीस स्टेशनच्या मागे, विरार (पूर्व) - ४०१३०५ येथे वकिलांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात पुराव्यानिशी कळवावे.

**भूमी बी. मोरे**
वकील उच्च न्यायालय, मुंबई

ठिकाण : विरार दिनांक : ३१-०७-२०२१



**या मुलाचे पालक कोण?**



**रेहान**

वय - ०६ वर्ष
दाखल दिनांक: १९/०७/२०२१
या मुलाचे कोणी पालक अथवा नातेवाईक असतील तर त्यांनी फोटो प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.
**बाल आशा ट्रस्ट**
के.जी. व्ही. एम. आनंदनिकेतन, डॉ. ई. मोसेस रोड, महालक्ष्मी, मुंबई-४०० ०११
फोन - ७२७६०२४६४६ / ९९३०९८६४००
**अथवा**
महिला व बालविकास आयुक्तालय
२८ क्वीन्स गार्डन, पुणे - ०१



**VINYL CHEMICALS (INDIA) LIMITED**
**CIN:** L24100MH1986PLC039837
**Regd. Office:** Regent Chambers, 7th Floor, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021. **Tel:** 2282 2708; **Fax:** 2204 3969
**Website:** www.vinylchemicals.com

**NOTICE**

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Monday, 9th August, 2021, to consider and take on record, inter alia, the Unaudited Financial Results (Provisional) for the quarter ended 30th June, 2021.

The information contained in this notice is also available on the Company's website www.vinylchemicals.com and also on the website of the BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com.

**for Vinyl Chemicals (India) Ltd.**
Place : Mumbai **P.C.Patel**
Date : 31/07/2021 **Secretary**


# मुंबईत घरोघर लसीकरणाला सुरुवात

## ज्येष्ठ नागरिक आणि आजारी वृद्धांचे लसीकरण

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी):** मुंबई महापालिका प्रशासनाच्या वतीने शहर आणि उपनगरातील आजारपणामुळे घराबाहेर पडू न शकणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींचे घरोघरी जाऊन लसीकरण करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाच्या वतीने घेण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. ३० जुलैपासून शहरात काही ठिकाणी घरोघर जाऊन लसीकरण करण्याला सुरुवात करण्यात आली. मुंबई महानगरपालिकेच्या 'के पूर्व' विभागातील अंथरुणाला खिळलेल्या पहिल्या रुग्णाला या उपक्रमाअंतर्गत लस देण्यात आली. दीर्घ आजारपणामुळे, शारीरिक अपंगत्वामुळे अंथरुणाला खिळून असलेल्या रुग्णांच्या



घरी जाऊन लसीकरण करण्यास मुंबईत शुक्रवारपासून सुरुवात करण्यात आली.

अशाप्रकारे लसीकरण करवून घेण्यासाठी शुक्रवारपर्यंत २०९ लोकांनी नोंदणी केली असल्याचे महापालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितले. शुक्रवारी पालिकेतर्फे काही रुग्णांना लस घरी जाऊन देण्यात आली. यापुढे अंथरुणाला खिळून असणाऱ्या व्यक्तींचे लसीकरण करायचे असल्यास त्यांची नावे, वय, पत्ता, संपर्क क्रमांक, अंथरुणात खिळून असण्याचे कारण इत्यादी माहिती covidvaccsbedriddengmail.com या मेल आयडीवर पाठवावीत, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

यासोबतच संबंधित व्यक्तींचे पुढील किमान सहा महिने अंथरुणात खिळून राहणार असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र, लस घेण्यासाठी अशा व्यक्तींचे संमतीपत्र किंवा नातेवाईक यांचे संमतीपत्र प्रशासनाला सादर करणे आवश्यक आहे. अशा व्यक्तींना 'कोव्हॅक्सिन' लस देण्याचे आदेश तज्ज्ञांच्या समितीने दिले आहेत, असे महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.




**मुंबई :** भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षा चित्रा वाघ यांची दै. 'मुंबई तरुण भारत'च्या जाहिरात विभागाचे साहाय्यक व्यवस्थापक आनंद वैद्य आणि जाहिरात प्रतिनिधी प्रशांत कांबळे यांनी शुक्रवार, दि. ३० जुलै रोजी भाजप प्रदेश कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी चित्रा वाघ यांना आनंद वैद्य आणि प्रशांत कांबळे यांनी 'कालजयी सावरकर' हे पुस्तक भेट म्हणून दिले.


**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**(घन कचरा व्यवस्थापन खाते एस विभाग)**
क्र. सअ/घकव्य/४०८७/एस दि. २९.०७.२०२१

**स्वारस्य अभिव्यक्ती**

सहाय्यक आयुक्त 'एस' विभागातील CCC1 विलिगीकरण कक्ष, क्वॉरंटाईन कक्ष, स्मशानभूमी, सरकारी कार्यालये, एस विभागातील विविध खात्यांच्या विभागीय चौक्यांमध्ये, मनपाचे दवाखाने व आरोग्य केंद्रांमध्ये, High Risk Contact Zone, या सर्व ठिकाणांवरील शौचालयांमध्ये तसेच अरुंद गल्यांमध्ये व चाळीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी NGO कामगार नियुक्त करून सोडीअम हायपोक्लोराईडची निर्जंतुकीकरण फवारणीचे काम करण्यासाठी इच्छुक स्थानिक संस्थांकडून अर्ज मागवित आहे.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्ज एस विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर अथवा सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा रु. २०००/- + ५% टक्के GST कर भरुन सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

संस्थेस अर्ज करण्याची मुदत ही दि. ०६.०८.२०२१ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत असून, संस्थेचे अर्ज दि. ०६.०८.२०२१ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत जमा करावे. जमा करताना संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्रे व इसारा रक्कम रु. ४०,०००/- भरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. ०६.०८.२०२१ रोजी दुपारी १.०० नंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

तसेच सदर योजनेची सोडत ही दिनांक ०६.०८.२०२१ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. अर्ज केलेल्या संस्थांच्या यादीमधून सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थेस अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे सोडत दिनांकापासून पुढील ०२ दिवसांत कार्यालयात दाखल करणे अनिवार्य असेल. तसेच सदर कामाकरिता एक स्वतंत्र संस्था प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थेने विहित वेळेत आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास, मनपाच्या प्रचलित पद्धतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम योग्य त्या कागदपत्रांची विहित वेळेत पुर्तता करण्यासापेक्ष देण्यात येईल.

सदर सोडतीकरिता सर्व पात्र संस्थेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/ खजिनदार यापैकी एक पदाधिकारी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही संस्थेचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता (घकव्य) एस विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

पीआरओ/७८३/जाहि./२०२१-२२ सही/-
स्वमजींनें औषधोपचार करू नका सहाय्यक आयुक्त एस विभाग


# वेतन बंद करण्यासाठी पराग शाह यांचे पालिकेला पत्र

## नगरसेवकपदाचे वेतन बंद करण्याचा पत्रात उल्लेख

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी):** भाजपचे विद्यमान आमदार पराग शाह यांनी मुंबई महापालिकेच्या चिटणीस खात्याला पत्र लिहून त्यांना मिळणारे नगरसेवकपदाचे मानधन रद्द करण्याची विनंती केली आहे. आ. शाह यांनी शुक्रवारी पालिका प्रशासनाला पत्र लिहून ही मागणी केली आहे.



कोटक व आमदार रमेश कोरगावकर नगरसेवकपदाचे मानधन घेत नाहीत, हे स्पष्ट झाले होते. तर आमदार रईस शेख, पराग शाह आणि दिलीप लांडे हे वेतन घेत होते. तेव्हा या खुलाशानंतर आमदार पराग शाह यांनी आपण भविष्यात नगरसेवकपदाचे मानधन घेणार नसून, त्याबाबत महापालिकेतील चिटणीस खात्याला पत्र लिहिणार असे स्पष्ट केले होते. त्या पार्श्वभूमीवर आ. शाह यांनी तत्काळ नगरसेवकपदाचे मानधन बंद करण्याची विनंती केली आहे.

**मुख्यमंत्री साहाय्यता कक्षाला ११ लाखांची मदत**

आमदार पराग शाह यांनी त्यांच्या वैयक्तिक खात्यातून स्वतः आणि आपल्या कुटुंबीयांच्या वतीने मुख्यमंत्री साहाय्यता निधीमध्ये सुमारे ११ लाख रुपयांची मदत केली आहे.

काही दिवसांपूर्वी 'आरटीआय' कार्यकर्ते अनिल गलगली यांनी दाखल केलेल्या याचिकेत देण्यात आलेल्या माहितीनुसार खासदार मनोज

# 'म्हाडा' वसाहतींमधील अनधिकृत बांधकामे पाडली जाणार

**मुंबई दि ३० (प्रतिनिधी):** 'म्हाडा' वसाहतींमध्ये झालेली अतिक्रमणे हटविण्यासाठी 'म्हाडा'कडून खासगी कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार १५ ऑगस्टनंतर वसाहतींमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरु होणार आहे. पहिल्या टप्प्यात नुकतीच झालेली अतिक्रमणे अतिक्रमण पथकाच्या रडारवर असणार आहेत, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

राज्य सरकारने 'म्हाडा'ला




नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिला आहे. यापूर्वी 'म्हाडा'कडे अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पथक अस्तित्वात होते. मात्र, हा विभाग बंद झाल्याने 'म्हाडा' वसाहतींमध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई बंद झाली होती. मात्र, आता 'म्हाडा'ने नियोजन प्राधिकरणाचा दर्जा प्राप्त होताच स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचे ठरवले आहे. त्यानुसार 'म्हाडा'ने अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी आवश्यक यंत्र, मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली आहे. कंत्राटदाराची नियुक्ती होताच 'म्हाडा'च्या मुंबई मंडळाने अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे. याबाबत 'म्हाडा' मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या नेतृत्वाखाली 'म्हाडा' मुख्यालयात नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत म्हसे यांनी ऑगस्ट महिन्यापासून कारवाई सुरू करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. त्यानुसार अधिकाऱ्यांनी 'म्हाडा'च्या वसाहतींमधील अनधिकृत कामांबाबत आलेल्या तक्रारींची माहिती जमा करण्यास सुरुवात केली असून, लवकरच अनधिकृत बांधकामांवर कारवाई होऊन आम्हाला दिलासा मिळेल, अशी अपेक्षा तक्रारदारांनी व्यक्त केली आहे.

# संसदेचे कामकाज रोखणाऱ्या गोंधळी खासदारांना दोन वर्षांसाठी निलंबित करा : रामदास आठवले

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी):** ''केंद्र सरकारकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे सरकारला कोणावरही पाळत ठेवण्याची आवश्यकता नाही. 'फोन टॅपिंग'ची गरज नाही. सलग तीन दिवस गोंधळ घातल्यानंतर चौथ्या दिवशीही जो संसद सदस्य आपली जागा



सोडून मर्यादेबाहेर वर्तन करून गोंधळ घालून संसदेचे कामकाज रोखण्याचा प्रयत्न करेल, अशा गोंधळी खासदारांना दोन वर्षांसाठी निलंबित करण्याचा नियम सरकारने बनवावा,'' अशी मागणी 'रिपाइं'चे अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.

''पेगॅसिस'बाबत विरोधकांचा केंद्र सरकारवरील आरोप बिनबुडाचा आहे. केंद्र सरकार सर्व विषयांवर चर्चा करण्यास तयार आहे. मात्र, विरोधक चर्चा न करता संसदेत गोंधळ घालत आहेत,'' या शब्दांत रामदास आठवले यांनी आपली नाराजी बोलून दाखवली.

# मुंबई महापालिकेच्या चिखलात 'कमळ' फुलणार

## भाजप नेते कृपाशंकर सिंह यांचा आत्मविश्वास

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी):** ''मुंबई महापालिकेवर गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेची सत्ता आहे. मात्र, महापालिकेत चिखल झाला असून, महापालिकेच्या चिखलात नक्कीच 'कमळ' फुलणार आहे,'' असा विश्वास भाजप नेते तथा माजी गृहराज्यमंत्री कृपाशंकर सिंह यांनी शुक्रवारी व्यक्त केला. 'मुंबई मराठी पत्रकार संघा'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महापालिका निवडणुकांसह अन्य महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली.

''शिवसेना आजपर्यंत राज्य सरकारकडून सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करत होती. मात्र, आता महापालिकेत व राज्यात त्यांचीच सत्ता असल्याने शिवसेनेने काहीतरी भरीव



असे काम करून दाखवावे,'' असे सिंह यांनी म्हटले आहे. ''महापालिकेच्या कारभाराला कंटाळलेल्या मुंबईकरांनी आता परिवर्तनाचा निर्णय घेतला असून, मुंबईकर येत्या निवडणुकीत परिवर्तन घडवतील,'' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**मी केवळ कार्यकर्ता!**

''मी, भाजपमध्ये साधा कार्यकर्ता म्हणून प्रवेश केला आहे. येत्या काळात माझा पक्ष मला जी कोणती जबाबदारी देईल, ती पार पाडण्यास मी तयार आहे,'' असेही कृपाशंकर यांनी स्पष्ट केले.

**काँग्रेस आणि पाकची भाषा एकच**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या 'कलम ३७०' हटवण्याच्या निर्णयाला पाठिंबा देत मी भाजपमध्ये प्रवेश केला. काँग्रेसने 'कलम ३७०'बाबतच्या निर्णयाला विरोध केला होता. त्यामुळे काँग्रेस आणि पाकिस्तानची भाषा एकच झाली आहे, असे आपण म्हणू शकतो. पक्षप्रवेश देश मोठा असल्याने मी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला.

**काँग्रेसला उत्तर जनताच देईल**


''महापालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी होईल, त्यावेळी जनताच मतदानातून त्यांना त्यांच्या टीकेचे उत्तर देईल.'', असे सिंह यांनी म्हटले आहे.

# मंगळवारी मुंबईत १५ टक्के पाणीकपात

## महापालिका प्रशासनाची माहिती

**मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी):** महापालिका क्षेत्रातील 'के पूर्व' विभागातील जलाशयांद्वारे करण्यात येणाऱ्या पाठपुराव्यातील अडचणी दूर करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सुधारणा अंतिम टप्प्यात असून या कामांमुळे मुंबई महापालिका क्षेत्रात मंगळवार, दि. ३ ऑगस्ट रोजी पाणीपुरवठ्यात १५ टक्के पाणीकपात होणार असल्याचे मुंबई महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

भूमिगत जलवाहिन्यांची जोडणी करणे, जलवाहिन्यांवर झडप बसविणे, मुख्य जलवाहिनीवर 'फ्लो मीटर' बसविणे इत्यादी कामे मंगळवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी हाती घेतली जाणार आहेत. यामुळे कुर्ला–घाटकोपर, अंधेरी (पूर्व व पश्चिम), राम मंदिर आणि गोरेगाव (पश्चिम) या परिसरातील काही भागांतील पाणीपुरवठा सकाळी ८.३० वाजल्यापासून ते रात्री १०.३० वाजेपर्यंत खंडित असणार आहे. तर काही परिसरातील पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे, असे पालिकेने स्पष्ट केले आहे. पाणी कपाती दरम्यानच्या कालावधीत नागरिकांनी पाणी वापराबाबत योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.




**पश्चिम रेल्वेद्वारे वांद्रे टर्मिनस ⇌ गोरखपूर दरम्यान ग्रीष्मकालिन विशेष गाडीच्या सेवांचा विस्तार**

| ट्रेन क्र. | सुरुवातीचे स्थानक आणि गंतव्य स्थान | सेवांचे दिवस | विस्तारित सेवांचे दिनांक |
|---|---|---|---|
| 05302 | वांद्रे टर्मिनस - गोरखपूर | शनिवार | ०७.०८.२०२१, १४.०८.२०२१ व २१.०८.२०२१ |
| 05301 | गोरखपूर - वांद्रे टर्मिनस | शुक्रवार | ०६.०८.२०२१, १३.०८.२०२१ व २०.०८.२०२१ |

थांब्यांसंबंधीच्या तपशीलवार वेळा आणि संरचनेच्या तपशीलवार माहितीकरिता, कृपया www.enquiry.indianrail.gov.in येथे भेट द्यावी.

- केवळ कन्फर्म तिकिट असलेल्या प्रवाशांनाच या विशेष गाड्यांमध्ये प्रवास करण्याची परवानगी देण्यात येईल.
- प्रवाशांना बोर्डिंग, प्रवास आणि गंतव्यस्थानी कोविड 19 संबंधित सर्व निकषांचे, मानक कार्यप्रणालींचे पालन करावे लागेल.

ट्रेन क्र. ०५३०२ च्या विस्तारित फेऱ्यांचे बुकिंग दि. ०१.०८.२०२१ पासून निर्धारित पीआरएस केंद्रांवर आणि आयआरसीटीसी वेबसाईटवर सुरू होईल. वरील ट्रेन संपूर्णतः आरक्षित ट्रेन म्हणून धावेल.

**पश्चिम रेल्वे**
www.wr.indianrailways.gov.in
Like us on : facebook.com/WesternRly
Follow us on : twitter.com/WesternRly

कृपया सर्व आरक्षित तिकिटांसाठी वैध पुरावा जवळ ठेवा.